**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे व पालघर जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ३३/२०१९** **दिनांक २२/०४/२०१९** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. अशोककुमार चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२३७३३९६

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १६/०४/२०१९ ते २२/०४/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २३/०४/२०१९ सकाळी ८:३० पासून २७/०४/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६/०४ | १७/०४ | १८/०४ | १९/०४ | २०/०४ | २१/०४ | २२/०४ | | २३/०४ | २४/०४ | २५/०४ | २६/०४ | २७/०४ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से) | ३३ | ३५ | ३५ | ३५ | ३६ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से) | २४ | २६ | २६ | २७ | २९ |
| - | - | - | - | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | २ | ० | १ | १ | २ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ५६ | ६४ | ५९ | ५२ | ४६ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | २१ | २१ | २३ | २० | १८ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ४ | ५ | ३ | ३ | ४ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | नै.प. | नै. | नै.प. | पू. | ई.उ. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | २३५९.६ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक २३ ते २७ एप्रिल, २०१९ पर्यंत कमाल व किमान तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **उन्हाळी भात** | **दाणे भरणे अवस्था** | • उन्हाळी भात पिक दाणे भरण्याच्या अवस्थेत असल्याने शेतात पाण्याची पातळी ५ सें. मी. पर्यंत ठेवावी. |
| **आंबा** | **फलधारणा अवस्था (अंडाकृती ते पक्वता अवस्था)** | • आर्द्रतेत होणारी घट व तापमानात होणारी वाढ यामुळे काढणी योग्य फळांची काढणी 'नूतन' झेल्याच्या सहाय्याने चौदा आणे (८० ते ८५ टक्के) पक्वतेला देठासह सकाळी १० वाजेपर्यंत किंवा संध्याकाळी ४ नंतर त्वरीत करावी. यामुळे फळामधील साक्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. आंब्याची फळे काढल्यानंतर सावलीमध्ये ठेवावीत तसेच आंबा फळांची वाहतूक रात्रीच्या वेळेस करावी. फळे काढणीच्या किमान ८ दिवस अगोदर झाडावर कोणतीही फवारणी करू नये.<br>• आंब्यावरील काढणी पश्चात बुरशीजन्य रोगापासून आंबा फळांचे संरक्षण करण्यासाठी काढणी नंतर लगेचच फळे ५२° सें. तापमानाच्या पाण्यात १० मिनिटे बुडवून काढावीत व नंतर फळे पिकविण्यासाठी ठेवावीत. डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठाने शिफारस केलेल्या कोरोगोटेड फायबर बॉक्समध्ये फळे पकिंग करावीत.<br>• आंबा फळांचे फळमाशीपासून संरक्षण करण्यासाठी विद्यापीठाने शिफारस केलेले "रक्षक फळमाशी सापळा" प्रती हेक्टरी ४ या प्रमाणात बागेमध्ये झाडाच्या खालील बाजूच्या फांद्यावर लावावेत. फळगळ झालेली आंबा फळे गोळा करून नष्ट करावी व बागेत स्वच्छता ठेवावी.<br>• बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना पहिली तीन वर्षे पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच बुंध्याभोवती आच्छादनाचा वापर करावा. |
| **नारळ** | **फलधारणा** | • बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, नारळ बागेत ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे.<br>• नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी नारळ बागेमध्ये शेणखताच्या खड्यात अळ्यांना मारण्यासाठी दर दोन महिन्यांनी क्लोरोपायरीफॉस २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| **चिकू** | **फुलोरा व फलधारणा** | • चिकू बागेतील किडग्रस्त तसेच गळलेली सर्व फळे गोळा करून जाळून नष्ट करावीत आणि बाग स्वच्छ ठेवावी.<br>• बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, चिकू बागेत ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच बुंध्याभोवती आच्छादनाचा वापर करावा. |
| **भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका** | **फुलोरा** | • बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, फळबाग रोपवाटिकेस, नवीन लागवड केलेल्या फळबागा तसेच भाजीपाला पिकास नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन** | **-** | • जनावरांच्या शरीराचे तापमान संतुलित राहण्यासाठी जनावरांना ताजे स्वच्छ व थंड पाणी मुबलक प्रमाणात देण्यात यावे तसेच उष्णतेचा दाह कमी करण्यासाठी वैरणीवर १ टक्के गुळपाणी आणि ०.५ टक्के मीठ यांचे स्वतंत्र द्रावण करून शिंपडावे.<br>• तापमानात वाढ संभवत असल्याने उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी गोठ्याचे/कुकुटपालन शेडचे छप्पर गवत, भाताचा पेंडा, किंवा नारळाच्या झावळ्या यांनी झाकून त्यावर अतिउन्हाच्यावेळी पाणी पडेल अशी व्यवस्था करावी तसेच वारा वाहत असलेल्या दिशेने गोठयाच्या / शेडच्या बाजूस पाण्यात भिजवलेले बारदान किंवा गोणपाट बांधावे.<br>• कुकुटपालन शेड मध्ये पाण्याची भांडी वाढवावी व पिण्यासाठी स्वच्छ आणि थंड पाण्याची मुबलक प्रमाणात देण्यात यावे. तसेच खाद्य सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळेस देण्यात यावे.<br>• पशु वैद्यकांच्या मार्गदर्शनाखाली शेळ्यांना देवी रोग प्रतिबंधक लसीकरण करून घ्यावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**